**<u>ठळक बातम्या</u>**

- ईशान्येकडची राज्य देशाच्या विकासाचं इंजिन बनत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / मिझोरम दौऱ्यात केलं ९ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन

- पाचवी जागतिक तटरक्षक दल शिखर परिषद भारतात होणार

- बिहार विधानसभा निवडणुकीत नीतिश कुमार हेच मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार

- नेपाळमधे हंगामी सरकारची स्थापना/ निवडणूक पुढच्या वर्षी ५ मार्चला होणार

**आणि**

- हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या दुहेरी गटात सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी अंतिम फेरीत दाखल

**<><><><>**

भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि ईशान्येकडची राज्ये देशाच्या विकासाचं इंजिन बनत आहेत. सरकारचं ॲक्ट इस्ट धोरण आणि ईशान्येच्या आर्थिक कॉरिडॉर योजनेत मिझोरामचं महत्त्वाचं योगदान आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मिझोरामची राजधानी आयझॉल इथल्या नऊ हजार कोटी रुपयांहून अधिकच्या विविध विकास योजनांचं आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं भूमिपूजन आणि उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते.

या योजना रेल्वे, रस्ते, ऊर्जा आणि खेळांसह विविध क्षेत्रांशी संबंधित आहेत. आठ हजार कोटी रुपये खर्चाच्या बैराबी-सैरांग या नव्या रेल्वे मार्गाचं प्रधानमंत्र्यांनी उद्घाटन केलं. या रेल्वेमार्गामुळं आयझॉल भारतीय रेल्वेच्या जाळ्याशी जोडला जाणार आहे. मिझोराममधलं सैरांग पहिल्यांदाच राजधानी एक्स्प्रेसच्या माध्यमातून थेट दिल्लीशी जोडला जाणार आहे. यामुळे मिझोरामचे शेतकरी आणि व्यापारी देशातल्या अधिकाधिक बाजारांपर्यंत पोहोचतील आणि रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील, असा विश्वास प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केला.....

**- - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - -**

४५ बोगदे आणि ५५ मोठे पूल असणारा हा रेल्वेमार्ग तयार करणं आव्हानात्मक होतं, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमात म्हणाले.

सैरांग-दिल्ली राजधानी एक्सप्रेस, सैरांग-गुवाहाटी एक्स्प्रेस आणि सैरांग-कोलकाता एक्स्प्रेस या तीन नव्या एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्री मोदी यांनी हिरवा झेंडा दाखवला. यानंतर ते गुवाहाटी इथं ज्येष्ठ आसामी गायक, भारतरत्न डॉ. भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

मिझोरामचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मणिपूरची राजधानी इम्फाळ इथं पोहोचले. या दौऱ्यात ते चुराचंदपूर इथं स्थानिकांशी संवाद साधतील तसंच जनसभेला संबोधित करतील. तिथं ते ७ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. त्यानंतर ते इम्फाळ इथंही ते सभा घेणार असून बाराशे कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्धाटन करतील.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात कपात करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला. जीएसटी कपात झाल्यामुळे अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे.

जीएसटी कपातीमुळे पर्यटन क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाबाबत जाणून घेऊया…

**- - होल्ड - व्हाईट कास्ट - -**

*(नव्या सुधारणेनुसार हॉटेलमधल्या निवासावरच्या जीएसटीमधे कपात झाली आहे. यामुळे पर्यटकांना परवडणाऱ्या दरात हॉटेल उपलब्ध होतील, आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसंच हॉटेल, होम स्टे आणि अतिथीगृहामधल्या गुंतवणूकीतही वाढ होईल.*

*त्याचप्रमाणे बस आणि मिनीबसच्या जीएसटी दरातही कपात झाल्यामुळे तिकीट दर कमी होतील. यामुळे पर्यटकांना प्रवास करण्यासाठी तसंच टूर एँड ट्रॅव्हल्स कंपन्यांना प्रोत्साहन मिळून पर्यटन क्षेत्राला लाभ होईल.)*

**<><><><>**

पाचवी जागतिक तटरक्षक दल शिखर परिषद भारतात आयोजित केली जाणार आहे. इटलीत रोम इथं झालेल्या चौथ्या जागतिक तटरक्षक दल शिखर परिषदेत काल ही घोषणा

झाल्याची माहिती भारतीय तटरक्षक दलानं समाज माध्यमांवरून दिली आहे. २०२७ साली भारतात चेन्नई इथं या परिषदेच्या पाचव्या आवृत्तीचं आयोजन केलं जाईल. या परिषदेचं भारताला मिळालेलं यजमानपद म्हणजे सागरी क्षेत्राचं नेतृत्व करण्याच्या दिशेनं भारताच्या प्रगतीमधला महत्वाचा टप्पा असल्याचं भारतीय तटरक्षक दलानं म्हटलं आहे.

दरम्यान, रोम इथं झालेल्या चौथ्या परिषदेत भारतासह ११५ देश आणि विविध संस्था सहभागी झाल्या होत्या. या परिषदेत भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक परमेश शिवमणी यांनी भारताच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व केलं. या परिषदेत जागतिक तटरक्षक दलांमधल्या परस्पर सहकार्याच्या मुद्यावर भर दिला गेला.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीकरता नीतीश कुमार हेच मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार असतील, असं उपमुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते सम्राट चौधरी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की भाजपा आणि रालोआ चा नीतिशकुमार यांच्यावर पूर्ण विश्वास असून त्यांच्या नेतृत्वाखालीच निवडणूक लढली जाईल. या निवडणुकीत मतदारयाद्यांचं सखोल परीक्षण हा मुद्दाच नाही, विरोधक त्याबाबत जनतेची दिशाभूल करीत आहेत असा आरोप त्यांनी केला.

**<><><><>**

नेपाळमधल्या हंगामी सरकारच्या प्रधानमंत्री म्हणून तिथल्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी काल त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्या नेपाळच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री आहेत. नवनियुक्त हंगामी प्रधानमंत्र्यांच्या शिफारशीवरुन राष्ट्रपती पौडेल यांनी लोकसभा बरखास्त केली असून पुढच्या वर्षी ५ मार्च रोजी निवडणूक घेण्यात येईल अशी घोषणा केली. नेपाळमधल्या हंगामी सरकार स्थापनेचं भारतानं स्वागत केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेपाळच्या हंगामी प्रधानमंत्री सुशीला कार्की यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

बांगलादेशात पुढच्या वर्षी **15** फेब्रुवारी **2026** पर्यंत मतदान होईल**,** अशी घोषणा सध्याच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार शफीक उल आलम यांनी काल केली. मागुरा

जिल्ह्यात श्रीपूर इथं ते पत्रकारांशी बोलत होते. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनीही गेल्या आठवड्यात फेब्रुवारी २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुका वेळापत्रकानुसारच झाल्या पाहिजेत, असं म्हटलं होतं.

<><><>

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनं अंतिम फेरी गाठली आहे. आज सकाळी उपान्त्य फेरीत या जोडीनं चीन ताइपेच्या चेन चेंग कुआन आणि लिन बिंग वेई जोडीचा २१-१७, २१-१५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

अंतिम लढतीत सात्विक आणि चिराग यांचा सामना लिआँग वेई केंग आणि वांग चेंग जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीच्या उपान्त्य फेरीत आज संध्याकाळी लक्ष्य सेनची लढत चीन ताइपेच्या चोऊ तिएन चेनशी होणार आहे. लक्ष्यने काल उपान्त्यपूर्व सामन्यात भारताच्याच आयुष शेट्टीला पराभूत केले होते.

<><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज ब गटात, अबुधाबी इथं श्रीलंका आणि बांग्लादेश यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान, काल अ गटात पाकिस्तान आणि ओमान यांच्यात झालेला सामना पाकिस्ताननं ९३ धावांनी जिंकला. या सामन्यात नाणेफेक जिंकल्यावर प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं निर्धारीत २० षटकांत ७ बाद १६० धावा केल्या. मोहम्मद हॅरीस यानं पाकिस्तानच्या वतीनं सर्वाधिक ६६ धावांची खेळी केली.

त्यानंतर विजयासाठी १६१ धावांचा पाठलाग करताना ओमानचा संपूर्ण संघ १६ षटकं आणि ४ चेंडुंमध्ये केवळ ६७ धावांमध्येच तंबूत परतला.

<><><>

अफगाणीस्तानमधे भूकंपामुळे २ हजारपेक्षा जास्त लोक मरण पावले असून पाच लाखापेक्षा जास्त लोकांना याचा फटका बसला आहे. त्यामुळे संयुक्त अरब अमिरातीनं अफगाणिस्तानला मानवतावादी साहित्य पाठवलं आहे. संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष

शेख मोहम्मद बीन जायेद अल नाह्यान यांच्या निर्देशानुसार अडीच हजार टन मानवतावादी साहित्य घेऊन जाणारं जहाज आज अबुधाबीहून अफगाणिस्तानला रवाना झालं. यात अन्नपदार्थ, निवारा साहित्य, वैद्यकीय उपकरणं आणि औषधांचा समावेश आहे.

**<><><><>**

रशियातल्या कामचात्का क्षेत्रातल्या पूर्व किनारपट्टीवर आज सकाळी सात पूर्णांक ४ दशांश रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. यानंतर या क्षेत्रात त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे.

**<><><><>**

कर्नाटकच्या हसन जिल्ह्यात काल संध्याकाळी गणेश मूर्ती विसर्जनासाठी आलेल्या गर्दीत एक मालवाहू ट्रक घुसून झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला. तर १८ हून अधिक जण जखमी झाले आहेत. समोरुन येणाऱ्या दुचाकीला टाळताना हा अपघात झाला. या अपघातात चालकही जखमी झाला असून त्याला ताब्यात घेण्यात आलं आहे.

**//<><><><>//**